SULA
VINEYARDS

Date: 21st February 2024

To,
**National Stock Exchange of India Limited ("NSE")**,
The Listing Department
"Exchange Plaza", 5th Floor,
Plot No. C/1, G Block, Bandra-Kurla Complex
Bandra (East), Mumbai – 400 051.

**NSE Symbol: SULA**
**ISIN: INE142Q01026**

To,
**BSE Limited ("BSE")**,
Corporate Relationship Department,
2nd Floor, New Trading Ring,
P.J. Towers, Dalal Street,
Mumbai – 400 001.

**BSE Scrip Code: 543711**
**ISIN: INE142Q01026**

**Sub: Press Release – Continuation of Wine Industrial Promotion Scheme**

Dear Sir/Madam,

Please find enclosed the press release titled "Continuation of Wine Industrial Promotion Schemes".

This disclosure is being made in compliance with Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

This is for your information and records.

Thanking you,
**For Sula Vineyards Limited**

RUCHI PRAMOD SATHE
Digitally signed by RUCHI PRAMOD SATHE
Date: 2024.02.21 20:31:15 +05'30'

**Ruchi Sathe**
**Company Secretary and Compliance Officer**
**Membership No.: A33566**
**a/a**

# Press Release

## Continuation of Wine Industrial Promotion Scheme

**Feb 21, 2024, Mumbai**: Sula Vineyards Limited (NSE: SULA) announced that the Maharashtra government has today issued a GR for the continuation of the Wine Industrial Promotion Scheme for a period of 8 years. Further details can be obtained from the GR attached to this release.

**About Sula Vineyards Limited**

Over the last two decades, Sula Vineyards has played a pivotal role in building the Indian wine industry. A true pioneer, not only did Sula establish the world's newest premium wine region of Nashik, it also put India on the global wine map. Sula's wines have won numerous awards in top global wine competitions including Decanter World Wine Awards and the International Wine Challenge.

With wineries in Maharashtra and Karnataka, Sula constantly explores the local terroir to make authentic artisanal wines - producing and selling over 1 million cases across India. Sula pioneered Wine Tourism in India and today over 3 lakh visitors visit Sula's iconic Nasik estate annually. Sula opened the country's first Winery Tasting Room in 2005, and India's first vineyard resort in 2010.

Firmly committed to remaining at the forefront of Indian wine, Sula continues to pioneer grape varieties, engage in sustainable agriculture and support the local rural economy. Along with innovation, Sula sees sustainability as a key pillar in all its operations and is one of Asia's most sustainable wine producers. Sula is the first Asian winery to join the International Wineries for Climate Action (IWCA), with the shared goal of net-zero emissions by 2050.

Website: www.sulavineyards.com
IG: @sula_vineyards
FB: @sula.vineyards
Youtube: @sulavineyardsyoutube
LinkedIn: @sulavineyards
Twitter: https://twitter.com/sula_vineyards

To experience our vineyards please visit: [sulavineyards.com/visit-us.php](sulavineyards.com/visit-us.php)



For further information please contact:

EY LLP Investor Relations
Runjhun Jain: Runjhun.Jain1@in.ey.com
Rhea Dharia: Rhea.Dharia@in.ey.com

Note: Certain statements in this document may be forward-looking statements. Such forward-looking statements are subject to certain risks and uncertainties like regulatory changes, local political or economic developments, and many other factors that could cause our actual results to differ materially from those contemplated by the relevant forward-looking statements. Further, past performance is not necessarily indicative of future results. Given these risks, uncertainties and other risk factors, viewers are cautioned not to place undue reliance on these forward-looking statements. The Company will not be in any way responsible for any action taken based on such statements and undertakes no obligation to publicly update these forward-looking statements to reflect subsequent events or circumstances.

वाईन उत्पादक घटकास प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रलंबित दावे निकाली काढणे व सदर योजनेची अंमलबजावणी पुढे सुरु ठेवणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- वाप्रयो-२०२०/ प्र.क्र.६६/ उद्योग-२**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक :- २१ फेब्रुवारी, २०२४**

**वाचा** :-१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक डब्ल्युआयपी२००१/ प्र.क्र.२९४४/ उद्योग-७, दिनांक १९ ऑक्टोबर २००१

२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूआयपी २००९/ प्र.क्र.३२८/२००९/ उद्योग- २, दिनांक ३१/०८/ २००९.

३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्र. डब्ल्यूआयपी २००९/ प्र.क्र.३२ / २००९ / उद्योग- २, दिनांक ०१/०२/ २०१०.

४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्रमांक डब्ल्यूआयपी २००९ / प्र.क्र.३२८/ उद्योग- २, दिनांक २१/०८/२०१०.

५)उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र. वाप्रोअ-१७१४/प्र.क्र३७/ उद्योग-२, दि.२७/१०/२०१४

६) शासन पत्र, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र.वाप्रयो-२०२०/ प्र.क्र.७९/उद्योग-२, दि.०७/०९/२०२०

**प्रस्तावना :-**

राज्यातील द्राक्षांवर आधारित वाईन उत्पादक घटकांना प्रोत्साहन म्हणून शासनाने द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण -२००१ संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयाद्वारे घोषित करण्यात आले आहे. नव्याने विकसित होत असलेल्या या उद्योगास प्रोत्साहन म्हणून अनुदान देण्याबाबत आदेश उद्योग विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील वाईन उत्पादकांना त्यांनी राज्यामध्ये उत्पादित केलेल्या व राज्यामध्ये दिनांक १ ऑगस्ट, २००९ पासून अंतिमत: विक्री झालेल्या, वाईनच्या विक्रीवर देय असलेला २०% मूल्यवर्धित कर भरल्यास त्यापैकी १६% कराच्या रकमेइतके वाईन उद्योग प्रोत्साहन अनुदान देण्यात येते.

२. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी लावलेल्या टाळेबंदीच्या स्थितीमुळे राज्याच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या विपरीत परिणामाच्या पार्श्वभूमीवर खर्चात काटकसर करण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. सदर उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने मा.मंत्रिमंडळाच्या दि.०२/०६/२०२० रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या वाईन उद्योगास प्रोत्साहान योजना (मागणी क्र.के-७, २८५२ ०४७२) या योजनेची अंमलबजावणी बंद करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला होता.

३. तथापि, वाईन उत्पादक घटकांना दिली जाणारी प्रोत्साहने ही राज्याचे द्राक्ष प्रक्रिया धोरण-२००१ चा एक भाग आहे. सदर घटक हे ॲग्रो प्रोसेसिंग सदराखाली मोडतात. पुर्वीपासून राज्याचे धोरण हे शेती व शेतीपुरक व्यवसायांच्या वाढीसाठी पुरक राहीले आहे. त्यामुळे राज्याचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अन्वये शेती व शेतीपुरक स्थापित होणाऱ्या सर्व उद्योगांना सर्वसाधारण उद्योगांना देय असलेल्या प्रोत्साहनांपेक्षा वाढीव प्रोत्साहने व वाढीव कालावधी अनुज्ञेय करण्यात आला आहे. राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतक-यांचे नुकसान होऊ नये, शेतक-यांना द्राक्ष लागवडीस प्रोत्साहन देणे, सुकामेवा बनविणे तसेच द्राक्षापासून आर्थिकदृष्ट्या अधिक लाभदायी पर्यायी उत्पादनांची निर्मिती व्हावी तसेच द्राक्षावर आधारीत वाईन उद्योगास प्रोत्साहन या प्रयोजनार्थ सदर योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजना ही द्राक्ष उत्पादक शेतक-यांकरीता तसेच राज्यात वाईन उद्योग विकसीत होण्यास उपयुक्त ठरली आहे.

वरील वस्तुस्थिती तसेच वाईन उत्पादक घटकास प्रोत्साहन योजनेची अंमलबजावणी ही सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असला तरी, वाईन उत्पादक घटकांमार्फत सन २०२०-२१,२०२१-२२ व २०२२-२३ या वर्षात मूल्यवर्धित कराचा भरणा केला आहे. या कालावधीतील प्रोत्साहन अनुदान म्हणून १६ टक्के परताव्याची रक्कम थकीत असून, सदर अनुदानाची रक्कम संबंधित वाईन घटकांना अदा करण्याची तसेच सदर योजना पुढे सुरु ठेवण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

कोरोना कालावधीत सन् २०२०-२१ या आर्थिक वर्षात अंमलबजावणी बंद करण्यात आलेली वाईन उत्पादक घटकास प्रोत्साहन योजना ही, राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकरी यांच्या हिताची तसेच राज्यात वाईन उद्योगाच्या विकासास पोषक असल्याने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

**(अ)** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात बंद करण्यात आलेल्या द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरणांतर्गत सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षातील वाईन उत्पादक घटकांना योजना बंद होण्यापूर्वी निश्चित केलेल्या दराप्रमाणे म्हणजेच १६ टक्के प्रमाणे मुल्यवर्धीत कराचा परतावा देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**(ब)** द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरणांतर्गत वाईन उत्पादक घटकास प्रोत्साहन योजना दिनांक ०१/०४/२०२३ पासून पुढील ५ (पाच) वर्षाच्या कालावधीपर्यंत पुढे सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कालावधीत प्रत्येक आर्थिक वर्षात एका वाईन उत्पादक घटकास देय प्रोत्साहन परताव्याची कमाल मर्यादा रु. २० कोटी (रु. वीस कोटी फक्त) पर्यंत राहील, तथापि, द्राक्ष उत्पादकांच्या अडचणी विचारात घेता, सन २०२३-२४ या एका वर्षाकरीता सदर रु. २० कोटी (रु. वीस कोटी फक्त) मर्यादेची अट शिथील करण्यात येत आहे.

**(क)** सदर ५ (पाच) वर्षाच्या कालावधीनंतर या योजनेचे सर्वकष मूल्यमापन करुन व आढावा घेवून वाईन उत्पादक घटकास प्रोत्साहन योजना पुढे सुरु ठेवण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

२. वाईन उत्पादक घटकास प्रोत्साहन योजनेअंतर्गत सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या कालावधीतील प्रलंबित असलेले दावे विक्रीकर विभागाकडून प्राप्त करुन घेवून ते उद्योग संचालनालयामार्फत मंजूरीकरीता सादर करण्यात यावेत. सदर प्रस्तावाची सविस्तर छाननी करुन, प्रस्ताव विहित वेळेत शासनाकडे सादर करण्याची जबाबदारी ही विकास आयुक्त (उद्योग) यांची राहील.

३. संबंधित सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत निर्गमित केलेल्या संदर्भ क्रमांक २ ते ५ येथे नमूद केलेल्या शासन निर्णय / परिपत्रक/ शुध्दीपत्रकातील अटी व शर्ती वर नमूद केलेल्या तारखेपर्यंत लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ०४/०१/२०२४ व दिनांक १४/०२/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०२२११४०६२४७३१० असा आहे. हे शासन ज्ञापन डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय दगांवकर)
सह सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
२. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
३. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

४. मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

५. मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

८. प्रधान सचिव(वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

९. प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

१०. सचिव(व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

११. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई-४०० ०३२.

१२. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई.

१३. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई -४०० ०१०.

१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई.

१६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर.

१७.राज्यकर सह आयुक्त, विक्रीकर भवन, नाशिक विभाग, पाथर्डी फाटा, नाशिक-४२२०१०.

१८.राज्यकर सहआयुक्त (व्हॅट व्यवस्थापन) सोलापूर विभाग, विक्रीकर भवन, विजापूर रोड, सोलापूर.

१९.राज्यकर सह आयुक्त, मोठे करदाते कक्ष-३, वस्तू व सेवा करभवन, माझगाव, मुंबई.

२०.राज्यकर सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे

२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२२. वित्त विभाग, (कार्यासन अर्थसंकल्प-१४/व्यय-१६/व्यय-८) मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२३. कक्ष अधिकारी (प्रशासन-१), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय -४०० ०३२.

२४. निवड नस्ती (उद्योग-२).